महाराष्ट्र सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 - शासकीय कर्मचारी/कुटुंबियांना औषधोपचारार्थ मिळणा-या सुविधा/तरतुदीमध्ये सुधारणा.

समितीची स्थापना.

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक: एमएजी-1096/सीआर-45/96/आ.7,

मंत्रालय, मुंबई-400 032, दिनांक 9 ऑगस्ट, 1996.

**शासन निर्णय-**

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम 1961 व त्या संबंधात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना शासकीय रुग्णालयात वैद्यकीय सेवा मोफत उपलब्ध आहेत. शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी त्यांना कोणताही खर्च करावा लागला तरी तो खर्च प्रतिपूर्ती योग्य असल्याचे समजण्यात येते. शासनाने विहित केलेल्या काही आकस्मिक निकडीच्या प्रसंगी दूरवरच्या शासकीय रुग्णालयात रुग्णांना नेणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने नेहमीच शक्य होत नसल्यामुळे घ्याव्या लागणा-या उपचारावरील खर्च रु.20 हजाराच्या मर्यादेत प्रतिपूर्तीस अनुज्ञेय आहे. तसेच काही विशिष्ट गंभीर आजारावरील उपचारासाठी शासनाने खाजगी रुग्णालयात उपचार करून घेण्यास मान्यता दिलेली असून या रुग्णालयातून केल्या जाणा-या उपचारावरील संपूर्ण खर्च प्रतिपूर्तीस अनुज्ञेय आहे. तथापि, वैद्यकीय सुविधांच्या व त्यावर करण्यात आलेल्या उपचारावरील खर्चाच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्याच्या संदर्भात काळाच्या ओघात आकस्मिक आजाराच्या सूचीमध्ये सुधारणा करणे, खर्चाची मर्यादा वाढविणे, काही प्रसंगी बाह्यरुग्ण आणि घेत असलेल्या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती करणे व देण्यात येणा-या अग्रिमात वाढ करणे यासारखे काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. या सर्व प्रश्नांचा अभ्यास करून त्यात योग्य ती सुसूत्रता व सुधारणा सुचविण्यासाठी तसेच तत्संबंधी इतर महत्वाच्या बाबींवर उपाय व पध्दती सुचविण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरून शासनाने आतापर्यन्त निर्गमित केलेल्या निर्णयांमधील उणीवा तसेच शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांना मिळत असलेल्या वैद्यकीय सुविधांचा आढावा घेऊन त्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे खाली नमूद केलेल्या सदस्यांची समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| (1) | सह संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई | अध्यक्ष |
| (2) | प्राध्यापक व विभाग प्रमुख, औषध शास्त्र, ग्रँण्ड वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| (3) | प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र, ग्रँण्ड वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| (4) | उप सचिव (रुग्णसेवा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| (5) | उप सचिव (वित्त) (वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती संबंधीत) | सदस्य |
| (6) | उप संचालक, आरोग्य सेवा (नागरी संरक्षण), मुंबई | सदस्य-सचिव |

उपरोक्त समितीस योग्य आणि आवश्यक वाटल्यास इतर शासकीय रुग्णालयांतील/वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्नित रुग्णालयांतील प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी यांना आमंत्रित करण्यास किंवा स्वीकृत सदस्य म्हणून अंतर्भूत करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

7 SEP 1996

या समितीची कार्यकक्षा (टर्म ऑफ रेफरन्स) खालीलप्रमाणे राहील.

1. मान्यताप्राप्त 23 आजारांव्यतिरिक्त अजूनही काही निकडीच्या आजारांचा या सूचीमध्ये समावेश करणे शक्य आहे काय किंवा या सूचीत समाविष्ट केलेल्या आजारांपैकी काही आजारांचा शासन मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यास व त्यावरील संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीस योग्य असल्याचे आढळून आल्यास, त्यांचा त्या सूचीमध्ये समावेश करता येणे शक्य आहे काय? तसेच काही आजार या सूचीतून वगळणे आवश्यक असल्यास त्याचा विचार करण्यात यावा.

2. आकस्मिक आजाराच्या सूचीत अंतर्भूत असलेल्या आजारांच्या संदर्भात वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या प्रकरणांमध्ये खरोखरच आकस्मिकता होती किंवा कसे हे प्रमाणित करण्यासाठी निश्चित स्वरुपाची ठोस मार्गदर्शक तत्वे सुचविणे.

3. मान्यताप्राप्त आजारावरील शस्त्रक्रियेचा, औषधोपचाराचा किंवा उपचाराच्या दरात प्रत्येक शहरा शहरां-मध्ये किंवा रुग्णालयांमध्ये फार तफावत आढळून येते. ही तफावत दूर करण्यासाठी प्रत्येक शहरातील किंवा प्रत्येक क्षेत्राची तसेच रुग्णालयांची वर्गवारी करून सर्वसामान्यपणे आजारावरील शस्त्रक्रिया, औषधोपचार, उपचार यांचे दर काय असावेत हे ठरविणे, व आवश्यक भासल्यास अशा खर्चाची मर्यादा ठरविणे.

4. आकस्मिक आजाराच्या सूचीत अंतर्भूत असलेल्या आजारावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या सध्याच्या मर्यादेचा विचार करून त्यात आवश्यकता भासल्यास सुधारणा सुचविणे.

5. मुत्रपिंडरोपण किंवा इतर महत्वाच्या शस्त्रक्रिया पूर्व/पश्चात बाह्यरुग्ण उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती करणे आवश्यक आहे काय, तसेच यापैकी काही गंभीर प्रकारच्या आजारांवर शस्त्रक्रियाव्यतिरिक्त किंवा पर्याय म्हणून करावयाच्या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती योग्य/अयोग्य ठरविणे.

6. काही विशिष्ट व अनिवार्य परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या आजारांवरील औषधोपचार मान्यताप्राप्त रुग्णालयांत करून घेता येणे शक्य नसल्यास इतर खाजगी रुग्णालयांमध्ये करून घेतलेल्या उपचारांवरील प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात यावी काय व असल्यास ती कोणत्या मानकावर.

7. गंभीर स्वरुपाच्या विशिष्ट आजारासाठी सध्या देण्यात येणा-या रु.45 हजाराच्या अग्रिमात वाढ करणे आवश्यक आहे काय व असल्यास ती कितीपर्यन्त.

8. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक: एमएजी 1091/1465/प्र.क्र.211/आ.7, दिनांक 17 फेब्रुवारी, 1992 नुसार रिकव्हरी कक्षाच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात आलेली नाही. अतितात्काळ प्रसंगी अति-दक्षता कक्ष अथवा नियमित कक्ष या दोनपैकी आवश्यक असलेल्या कक्षावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत विचार करणे.

9. समितीस आवश्यक भासतील अशा इतर अनुषंगिक बाबी.

सदर समितीने आपला अहवाल 6 महिन्यांच्या आत शासनास सादर करावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.496/सेवा-5 व क्र.721/सेवा-5 अनुक्रमे दिनांक 30 एप्रिल, 1996 व 11 मे, 1996 अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गंगला यादव)

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

प्रति,

डॉ. एस. बी. चव्हाण, सहसंचालक (वैद्यकीय) आरोग्य सेवा, मुंबई,

उप संचालक, आरोग्य सेवा (ना सं.), मुंबई,

एच-661(1500-8-96)-1अ.